## प्रेसनोट दि.१३/०७/२०१९

# सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीमध्ये दुचाकी स्वारास लुटणाऱ्या तिघांना रात्रगस्तकामी असणारे पोलीसांनी तात्काळ शोध घेवुन घेतले ताब्यात

--------------------------------------------------------------

सिंहगडरोड पो.ठाणे गुन्हा रजि.नं. ४८६/२०१९ भा.दं.वि. कलम ३९४,३४ मधील फिर्यादी नामे चिन्मय चंद्रकांत पार्डीकर, वय २१ वर्षे, रा. फ्लॅट नं. १९, स्वामी समर्थ रेसीडेन्सी, नवले हॉस्पीटलच्या समोर, नहेगाव, पुणे हे दि. १२/०७/२०१९ रोजी रात्रौ ०१.१५ वा. चे सुमारास त्यांचे होंडा पॅशन मोटार सायकल नं. एम.एच. २६ ए.यु. १७८८ हीचेवरुन नवले पुल, सर्व्हिस रोड, बिसलरी चौक, वडगाव बुाा. येथे आले असता सिल्व्हर काळया रंगाच्या प्लॅटीना मोटार सायकल नं. एम.एच. १२ डी.ब्ल्यु. ५०९७ यावरील तिन अनोळखी ईसमांनी त्यांना आडवुन त्यांना जबरदस्तीने गाडीवरुन खाली पाडुन त्यांच्या पॅन्टच्या खिशांची झडती घेवुन त्यांच्याकडे असलेले एका बाजुने धारदार व दुसया बाजुने दातया असलेले स्टीलचे हत्यार दाखवुन जिवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या मनगटाच्या मागील बाजुस वार करुन जखमी करुन पॅन्टच्या खिशातील ७००/- रु. जबरदस्तीने काढुन फिर्यादी यांचे मोटार सायकलची चावी जबरदस्तीने घेवुन फिर्यादी यांचे मोटार सायकलसह निघुन गेले होते. त्याचवेळी त्या ठिकाणी रात्रगस्त करीता असलेले वडगाव मार्शलचे पोलीस कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे त्या ठिकाणी पोहचल्याने त्यांनी तात्काळ सिंहगडरोड पो.स्टे.चे रात्रगस्त अधिकारी पोलीस उप-निरीक्षक व्ही.जे.महांगडे, पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे, तपास पथकाचे सपोफौ ओंबासे, पोना चेतन चव्हाण, पोशि धनाजी धोत्रे व पोशि योगेश झेंडे यांना सदरबाबत माहिती दिल्याने सिंहगडरोड पोलीसांनी तात्काळ आरोपींचा शोध घेतल्याने आरोपी १) सुनिल बाबु मरगळे,वय-१९,रा.मु.पो. भोडे,ता.मुळशी,जि,पुणे व दोन विधीसंघर्षीत बालक यांना सिंहगडरोड पोलीसांनी ताब्यात घेवुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.